# तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र

(डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली)

तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, बांद्रा (पु), मुंबई – ४०००५१

फोन क्र. ०२२ २६५१ ६८१६; ई-मेल: tmbrs@rediffmail.com


---

जा. क्र. / तासाजीसंके/DPDC-Palghar/चहानाष्टा-जेवण/२०५/ २०२२ दिनांक : २३.०६.२०२२

प्रति,

-------------- विद्यापीठ संकेतस्थळ ----------

-----------------------------------------------

विषय: प्रशिक्षण कार्यक्रम आणि चर्चासत्रामध्ये प्रशिक्षणार्थींना अथवा लाभार्थींना चहा व नाष्टा आणि दुपारचे जेवण पुरवण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत....

तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, मुंबई या संशोधन केंद्रामार्फत जिल्हा नियोजन समिती, पालघर जिल्हा पुरस्कृत **"पालघर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रात स्वयंरोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे"** या प्रकल्पाअंतर्गत सन २०२२ – २०२३ या वर्षात विविध प्रशिक्षणे आणि चर्चासत्रे आयोजित करून राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर आठ प्रशिक्षणे (तीन दिवसीय) (प्रति प्रशिक्षण २५ प्रशिक्षणार्थी) आणि दोन चर्चासत्रे (एक दिवसीय) ) (प्रति चर्चासत्र ५० लाभार्थी) आर्थिक वर्ष २०२२ – २०२३ दरम्यान पालघर जिल्ह्यामधील विविध तालुक्यामध्ये आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

उपस्थित प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणादरम्यान सलग तीन दिवस सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे जेवण आणि संध्याकाळचा चहा, बिस्किट आणि एक दिवसिय चर्चासत्रामध्ये एका दिवसाचा सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे जेवण आणि संध्याकाळचा चहा, बिस्किट यांचा पुरवठा करणे अपेक्षित आहे. त्याकरीता खालील विवरणाप्रमाणे दर पत्रक पुरवावे.

| अ. क्र. | तपशील | दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | चहा – प्रत्येकी १०० मिली (साधा) | |
| २. | नाष्टा – प्लेट<br>पोहे / उपमा / शिरा (प्रत्येकी १५० ग्रॅम)<br>यापैकी १ (प्रत्येकी १५० ग्रॅम) | |
| ३. | जेवण शाकाहारी: १ वाटि सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी (प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी), ३ चपाती, भात (प्रत्येकी १५० ग्रॅम), डाळ (घट्ट १५० मिली), पापड (प्रत्येकी १ नग), लोणचे (प्रत्येकी १५ ग्रॅम), स्वीट १ डिश, दह्याची एक वाटी (१०० ग्रॅम), कोशिंबिर (५० ग्रॅम) | |
| ४. | संध्याकाळचा चहा आणि बिस्किट | |

तरी आपणास विनंती करतो कि वर अनूद केल्या प्रमाणे पुरवठा करण्यासाठीचा कमीत कमी आणि स्पर्धात्मक दर निविदे मध्ये नमुद करून, खालील अटी व शर्थींना अधीन राहून खाली दिलेल्या पत्त्यावर विहित मुदतीत निविदा सादर करावी.

अटी व शर्ती

१ बंद लखोट्यातील दरपत्रके दि. ०७.०७.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा, मुंबई कार्यालयात पोस्ट/हाथबटवडा/कुरियर ने पोहोच होणे आवश्यक आहे.

२ दरपत्रके हातबटवड्याने स्विकारली जाणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

३ बंद लखोट्यावर **"सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे जेवण आणि संध्याकाळचा चहा, बिस्किट यासाठी दरपत्रके"** पुरवठ्याचे दरपत्रक असा उल्लेख करणे.

४ विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०८.०७.२०२२ रोजी या कार्यालयात उघड्ण्यात येतील.

५ टपाल खात्याचे विलंबनास, हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६ दरपत्रकामध्ये पूरवठादाराने **GST** क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

७ **GST** क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेले पूरवठादाराचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत पॅन कार्डची प्रत जोडणे आवश्यक आहे.

८ अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे, तसेच संबंधित कंपनीची अधिकृत दरसुची जोडावी.

९ दरपत्रकामध्ये संबंधित सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१० **सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे जेवण आणि संध्याकाळचा चहा, बिस्किट** हे प्रकल्प प्रमुख तथा सहा. संशोधन अधिकारी, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा, मुबई – ४०० ०५१ यानी वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे पालघर जिल्ह्यातील विविध तालुक्यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाच्या तसेच चर्चासत्र आयोजनाच्या ठीकाणी वेळेत पुरवठा करावयाचे आहे त्या दृष्टीने, दरपत्राकामध्ये सवस्तिर नोंद असावी.

११ कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छधिकारावर हे दरपत्रक रदद करण्याचा / मागे घेण्याचा / दुरूस्ती करण्याचा किंवा नियत तारीख वाढवण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

आपला विश्वासू,

संशोधन अधिकारी,
तासाजिसंके, बांद्रा, मुंबई

प्रतः

१ नोटीस बोर्ड, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा (पुर्व), मुंबई.

२ मा. संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि रत्नागिरी.

३ मा. विस्तार शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.

४ व्यवस्थापक, कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी (akmudbskkv@gmail.com)

३/ यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या जाहिरातीस विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.dbskkv.org) प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.